नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 15/01/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण 22,65,000/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक 13/01/2021 रोजी पोलिस निरीक्षक श्री दिलीप ठाकुर पोलिस स्टेशन केळवद यांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन पांढुर्णा ते नागपूर या मार्गाने एमपी–04/एचई– 1020 क्रमांकाच्या ट्रक मध्ये काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करत आहे. अशा खबरेवरून पोलिस निरीक्षक श्री दिलीप ठाकुर हे पो.स्टे केळवद स्टाफसह पांढुर्णा ते नागपुर हायवे क्रमांक 47 वरील बिहाडा फाटयाजवळ नाकाबंदी लावली. दरम्यान 03:00 वा. एमपी–04/एचई– 1020 क्रमांकाचा ट्रक येतांना दिसले. तेव्हा सदर वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन नाकाबंदीच्या ठिकाणी न थांबविता नागपूरच्या दिशेने बेदरकारपणे पळवु लागला. त्याचा पाठलाग करून भागेमाहरी बस स्टाप येथे थांबविले असता वाहन चालक व तयाचे सोबत असलेले साथीदार आजु–बाजुला असलेल्या शेतशिवारात पळु लागले. त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. सदर आरोपी नामे– 1) भुरे बाबु खॉ, वय 53 वर्ष, रा. सिहोरा, जि. रायसेन एम.पी, 2) आसीप शम्मी खा, वय 27 वर्ष, रा. सिहोरा इमालीया म.प्र., 3) शब्बीर सलीम शेख, वय 33 वर्ष, वार्ड नं 13, दमुआ, जि. छिंदवाडा, 4) मोहम्मद हकीम सोहेल हकिम, वय 22 वर्ष, रा. काजीकेम नगर पुराने नाले के पीछे, बेरसीया रोड, भोपाल म.प्र., 5) यूनूस अब्दुल रहेमान उस्मान शेख, रा. उमराव दुल्हा बागळाना एस बाग भोपाल म.प्र. व 6) अब्दुल रहेमान उस्मान शेख रा पातुर, जी अकोला यांनी त्याचे वाहनामध्ये एकुण 51 (बैल, गोरे,गोवंश) कि. 7,65,000/—रू. चे जनावर क्रुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 22,65,000/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपीतांविरूद्ध पोलिस स्टेशन केळवद येथे अप क्र 10/2021 कलम आरोपीतांविरुध्द कलम 279, 109, 34, 11 कलम 11 (1)(घ)(ड)(च)119 प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, तसेच कलम 192 अ, 179, 184 मोवाका अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. चार आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राठोड हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक श्री. अर्जुन राठोड, नापोशी रविन्द्र चटप, पोशि सचिन येळकर, श्रीधर कुलकर्णी, धोंडुतात्या देवकते व चालक गुणेश्वर डाखोळे व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर